**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश.**

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/ग्रापनि-२०२३/प्र.क्र. ०३ /का-८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- ३० जानेवारी, २०२३.

## आदेश

**संदर्भः-** १) राज्य निवडणूक आयोगाचे क्र. एसईसी/एमसी/२००२/प्र.क्र.१/का.१०, दि. २ जानेवारी, २००२ चे आदेश.
२) राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का.५,दि. ११ ऑक्टोबर, २०१० चे आदेश.
३) राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/मनपा-२०१२/प्र.क्र.४/का.५, दि. ७ फेब्रुवारी, २०१२ चे परिपत्रक.
४) राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.११/का.७, दि. २५ जानेवारी,२०१७ चे आदेश.
५) राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.६/का.८, दि. २५ सप्टेंबर, २०१७ चे आदेश.
६) राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.१/का.८, दि. ९डिसेंबर, २०२० चे आदेश.
७) राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र.४५/का.५, दि. २४ जून, २०२२ चे आदेश.

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकांचे आयोजन करण्यासाठी अधीक्षण, संचलन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १९(ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ७-अ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महा. ५) च्या कलम १३, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १२ अन्वये, राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी (लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या

तरतुदींन्वये तयार केलेली) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता संबंधित प्रभागांमध्ये विभागून व अधिप्रमाणित करुन वापरण्याबाबत तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी संबंधित प्रभागामध्ये विभागून वापरण्यात येते. असे करीत असताना सदर मतदार यादीमध्ये मूळ विधानसभा मतदार यादीत नसलेली कोणतीही नवीन नावे समाविष्ट करण्याचे अथवा मूळ विधानसभा मतदार यादीत असलेली नावे वगळण्याचे; तसेच नाव व पत्त्यामध्ये दुरूस्ती करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला नाहीत किंवा राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीकरिता प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास नाहीत.

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीची मतदार यादी प्रभागनिहाय विभाजित करताना विधानसभेच्या मतदार यादीतील सेक्शन ॲड्रेस हे मोघम, अपूर्ण किंवा चुकीचे असल्यास, सेक्शन ॲड्रेसनुसार एखादी इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था ही सेक्शन ॲड्रेसनुसार ज्या प्रभागात समाविष्ट होत असते, त्या प्रभागाच्या भौगोलिक हद्दीत ती इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था प्रत्यक्षात स्थित नसते. त्यामुळे सदर इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था ही प्रत्यक्षात भौगोलिक रचनेनुसार ज्या प्रभागात समाविष्ट होणे आवश्यक आहे, त्याऐवजी ती चुकीच्या सेक्शन ॲड्रेसमुळे अन्य प्रभागात समाविष्ट होते. परिणामी त्या इमारतीतील मतदारांची नावेही दुसऱ्या प्रभागात समाविष्ट होतात.

आणि ज्याअर्थी, सदर परिस्थिती ही विशेषत: लगतच्या प्रभागांच्या सीमांवर आढळते. अशावेळी केवळ सेक्शन ॲड्रेस लक्षात न घेता, सदर इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेतील मतदारांची नावे ही ती इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था प्रत्यक्षात ज्या प्रभागात स्थित आहे, त्याच प्रभागात समाविष्ट करणे अपेक्षित आहे. मात्र तसे होत नसल्यास, मतदारांकडून तक्रारी प्राप्त होतात.

तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करताना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राच्या बाहेर असलेल्या मतदारांची नावे समाविष्ट झाल्याबाबत देखील तक्रारी प्राप्त होतात.

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्यासाठी मतदार यादीत मतदारांची नावे योग्य त्या प्रभागात समाविष्ट करताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्याकरिता योग्य त्या कार्यपद्धतीचा अवलंब करुन मतदार यादी निर्दोष करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महा. ५) च्या कलम ९ए (४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए (४) अनुसार **संदर्भाधीन सर्व आदेश याद्वारे अधिक्रमित करुन** पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

१. **विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरणे-** राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्त्वात असलेली विधानसभेची मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभागांमध्ये विभागून ती निवडणुकीसाठी छापून घेणे व अधिकाऱ्यांनी अधिप्रमाणित करणे आवश्यक आहे. असे करताना संबंधित क्षेत्राची विधानसभेची मतदार यादी जशी असेल तशी संबंधित प्रभागांमध्ये विभागावयाची आहे. त्यामध्ये कोणतीही नावे वाढविणे, कमी करणे किंवा त्यामध्ये सुधारणा करणे इत्यादींची अनुमती देण्यात आलेली नाही. मतदार यादी विभागतांना प्रभागाच्या हद्दीवर राहणाऱ्या मतदारांच्या संदर्भात विशेष दक्षता घेणे आवश्यक असून त्यासाठी गरज वाटल्यास स्थळ निरीक्षण करुन यादी विभागावयाची आहे, असे करताना एका प्रभागाच्या हद्दीतील मतदारांची नावे अन्य

प्रभागाच्या मतदार यादीत समाविष्ट होणार नाहीत, हे पाहणे आवश्यक आहे. राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्त्वात असलेली मतदार यादी (मूळ यादी व अधिसूचित दिनांक या दरम्यानच्या कालावधीत झालेली पुरवणी यादी) याचा काळजीपूर्वक विचार करुन त्यानुसार विधानसभेच्या मतदार यादीमध्ये सुधारणा करुन ती वापरणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रामध्ये येणारे विधानसभा मतदार यादीमधील कोणतेही मतदार वगळले जाणार नाहीत तसेच क्षेत्राबाहेरील मतदार चुकीने समाविष्ट होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

२. **प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करणे-** राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार यादी कार्यक्रमानुसार नेमून दिलेल्या दिनांकास प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिद्ध करण्यात यावी. मतदार यादी प्रसिद्धी मोहीम राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादी कार्यक्रमात नेमून दिल्यानुसार राबविणे बंधनकारक राहील. तसेच अधिकाधिक मतदारांना मतदार यादी प्रसिद्धीची माहिती होण्याकरिता अन्य मार्गानेही प्रसिद्धी मोहीम राबविता येईल.

३. **प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर निर्णय घेणे-** राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विचार करुन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येत असलेल्या विधानसभा मतदार यादीत फक्त खालील परिस्थितीत बदल करता येतील:-

अ) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभागानिहाय मतदार यादीमध्ये कोणत्याही प्रभागात नावे समाविष्ट करण्यात आली नसल्यास, अशा मतदारांची नावे योग्य प्रभागात समाविष्ट करणे.

ब) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे नसतानाही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभागानिहाय मतदार यादीमध्ये नावे समाविष्ट करण्यात आली असल्यास, अशा मतदारांची नावे वगळणे.

क) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभागानिहाय मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट असून, एका प्रभागाऐवजी चुकून दुसऱ्या प्रभागात अंतर्भूत झालेले मतदार.

**४. मतदार यादीसंदर्भात आलेल्या हरकती व सूचनांवर निर्णय घेणे-**

अ) 'परिच्छेद'- ३ (अ) व ३ (क) मध्ये प्राप्त झालेल्या हरकतींबाबत संबंधित मतदाराने अथवा सहकारी गृहनिर्माण संस्थेने सोबतच्या 'परिच्छेद'-अ मधील विहित नमुन्यात तक्रार केल्यास खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबवावी :-

१) मतदाराने विहीत मुदतीत स्वत:च्या वास्तव्याच्या पुराव्यासह सोबतच्या 'परिच्छेद'- अ मध्ये अर्ज दाखल करणे आवश्यक राहील. तसेच एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेने त्यांच्या सर्व सभासदांच्यावतीने संस्थेच्या लेटरहेडवर सर्व पुराव्यासह 'परिच्छेद'- अ मध्ये अर्ज दाखल करता येईल.

२) संबधित प्राधिकृत अधिकारी यांनी, मतदाराने / सहकारी गृहनिर्माण संस्थेने अर्जासोबत सादर केलेले वास्तव्याचे पुरावे तपासून, आवश्यकतेनुसार नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यामार्फत स्थळ पाहणी करून, मतदार यादी अंतिम करताना योग्य तो निर्णय घ्यावा व त्यानुसार संबधितांचे नाव योग्य त्या प्रभागाच्या मतदार यादीत समाविष्ट करावे.

ब) 'परिच्छेद'-३ (ब) मध्ये प्राप्त झालेल्या हरकतींबाबत संबंधित मतदाराने सोबतच्या 'परिच्छेद'-ब मधील विहित नमुन्यात तक्रार केल्यास खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबवावी :-

१) मतदाराने विहित मुदतीत ज्या मतदाराच्या बाबतीत तक्रार दाखल केली आहे, त्या मतदाराच्या वास्तव्याच्या पुराव्यासह सोबतच्या 'परिच्छेद'-ब मध्ये अर्ज दाखल करणे आवश्यक राहील (कोणत्याही परिस्थितीत गठ्ठ्या पध्दतीने हरकती दाखल करून घेता येणार नाही व प्रत्येक मतदारासाठी स्वतंत्र हरकत अर्ज दाखल करावे लागेल).

२) अशा हरकतींवर निर्णय घेण्यापूर्वी ज्या मतदारांचे नाव वगळण्यात येणार आहे, त्या मतदारांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी नोटीस बजावून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात यावे व त्यानंतरच योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

मात्र उपरोक्त कार्यवाही करतांना ज्या मतदाराचे अथवा मतदारांची नावे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राशी संबंधित विधानसभा मतदार यादीत नसतील अशा मतदारांची नावे नव्याने समाविष्ट करता येणार नाहीत.

उपरोक्त बदल हे फक्त त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपुरतेच राहतील. विधानसभा मतदार यादीमध्ये बदल करण्यासाठी मतदाराने संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील.

५. **अंतिम मतदार यादीत किरकोळ दुरुस्ती:-** स्थानिक स्वराज्य संस्थेची मतदार यादी अंतिमरित्या प्रसिद्ध झाल्यानंतर नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या अखेरच्या दिनांकापर्यंतच त्यात काही दुरुस्त्या करता येतील. त्यानंतर कोणत्याही दुरुस्त्या करता येणार नाहीत. अंतिम मतदार यादीत फक्त खालीलप्रमाणे दुरूस्ती करता येईल :-

१) विधानसभा मतदार यादीवरुन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी विधानसभा मतदार यादी प्रभागनिहाय विभागून, छापून व अधिप्रमाणित करुन प्रसिद्ध केल्यानंतर, काही मतदारांची नांवे ज्या प्रभागात असणे आवश्यक आहे त्याऐवजी दुसऱ्याच प्रभागाच्या मतदार यादीत चुकीने छापण्यात आल्यास अथवा राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस ज्या मतदारांची नावे संबंधित क्षेत्राच्या विधानसभा मतदार यादीत असूनदेखील ती नावे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या प्रभागनिहाय मतदार यादीत छापावयाचे राहून गेल्यास, मतदार यादी तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याने त्यासंदर्भात स्वत: मतदाराने 'परिच्छेद'-अ मध्ये अर्ज केल्यास,

त्याबाबत आवश्यक ती तपासणी करून मतदार यादी तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याने त्याबाबत योग्य त्या दुरुस्त्या पुरवणी यादीच्या स्वरुपात कराव्यात.

२) मात्र, याचा अर्थ असा नव्हे की, मतदार यादीत नवीन नावे समाविष्ट करण्याची अथवा वगळण्याची परवानगी देण्यात आली आहे.

सदर आदेश हे सर्व ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी लागू राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
उपसचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी
२) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी
३) आयुक्त, सर्व महानगरपालिका
४) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
६) निवड नस्ती.

## परिशिष्ट-अ

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. क्र. रानिआ/ग्रापनि-२०२३/प्र.क्र.०३/का.८, दि. ३०/०१/२०२३ सोबतचे)

----------------------- (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव) सार्वत्रिक / पोटनिवडणूक सन ------------

**विषय:- प्रारूप मतदार यादीवरील हरकत अर्ज - योग्य प्रभागात नाव समाविष्ट करण्यासाठी.**

प्रति,
प्राधिकृत अधिकारी (मतदार यादी)
प्रभाग क्रमांक -------------
----------------- (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव)

मतदाराचे / अर्जदाराचे नाव ----------------------

संपूर्ण पत्ता --------------------- (रहिवासाचा पुरावा जोडावा.)

संपर्क क्रमांक / मोबाईल क्रमांक ------------------------------

| अ.क्र. | नाव | विधानसभा क्र. / यादीभाग क्र. / व अनुक्रमांक | प्रारुप मतदार यादीतील प्रभाग क्रमांक | प्रारुप मतदार यादीच्या प्रभागातील अनुक्रमांक | ज्या प्रभागात नाव समाविष्ट होणे अपेक्षित आहे, तो प्रभाग क्रमांक | रहिवासाबाबतच्या जोडलेल्या पुराव्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| उदा. १) | श्री. -------- | २५/२०८/९१६ | ५ | ६५०१ | ६ | आधार कार्ड |
| २) | | | | | | |

मी विनंती करतो की, वर नमूद केल्यानुसार माझे व कुटुंबियांचे नाव / आमच्या गृहनिर्माण संस्थेतील मतदारांची नावे चुकीच्या प्रभागामध्ये समाविष्ट झाली असून, ती आमचे वर नमूद केल्यानुसार जोडलेले रहिवासाचे पुरावे तपासून योग्य त्या प्रभागात समाविष्ट करण्याबाबत कृपया कार्यवाही करावी.

दिनांक :

मतदाराची स्वाक्षरी /
किंवा गृहनिर्माण संस्थेच्यावतीने अर्ज असल्यास
त्यांचा अध्यक्ष / सचिव यांची स्वाक्षरी

ठिकाण :

(नाव----------------------)

टीप-

1. मतदार स्वत: अर्ज सादर करु शकत नसल्यास-
   सदर अर्ज सादर करणाऱ्या व्यक्तीचे नाव :- --------------------- मोबाईल नं. -------------
2. जोडलेल्या पुराव्यांची संख्या.

## परिशिष्ट- ब

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/ग्रापनि-२०२३/प्र.क्र.०३/का.८, दि. ३०/०१/२०२३ सोबतचे)

----------------------- (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव) सार्वत्रिक / पोटनिवडणूक सन ------------

**विषय:- प्रारूप मतदार यादीवरील हरकत अर्ज - नाव वगळण्यासाठी.**

प्रति,
प्राधिकृत अधिकारी (मतदार यादी)
प्रभाग क्रमांक -------------
----------------- (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव)

तक्रारदाराचे नाव ----------------------

संपूर्ण पत्ता --------------------- (रहिवासाचा पुरावा जोडावा.)

संपर्क क्रमांक / मोबाईल क्रमांक ---------------------------

ज्या मतदाराबाबत आक्षेप घेण्यात येत आहे, त्या

मतदाराचे नाव ------------------------------

संपूर्ण पत्ता ------------------------------

प्रभाग क्रमांक / मतदार यादीतील अनुक्रमांक ------------------------------

दिनांक : मतदाराची स्वाक्षरी
ठिकाण : (नाव----------------------)